पुणे, गुरुवार १३ सप्टेंबर २०१२ | लोकसत्ता

# दहा वैज्ञानिकांना इंडिया सायटेशन पुरस्कार

**पीटीआय**
**नवी दिल्ली**

पुण्याच्या 'आयुका'तील प्राध्यापक व सैद्धान्तिक भौतिकशास्त्रज्ञ धनू पद्मनाभन व वरुण साहनी, पर्यावरण वैज्ञानिक विनोदकुमार गर्ग यांच्यासह दहा वैज्ञानिकांना इंडिया सायटेशन पुरस्कार जाहीर करण्यात आले आहेत. थॉमसन रॉयटर्स या संस्थेच्या वतीने हे पुरस्कार दिले जातात.

पुरस्काराच्या इतर मानकऱ्यांमध्ये अनुनय सामंता (फिजिकल केमिस्ट्री, फोटोकेमिस्ट्री), मुरली शास्त्री (नॅनोबायोटेक्नॉलॉजी), रबिन बॅनर्जी व संदीप त्रिवेदी (सैद्धान्तिक भौतिकशास्त्रज्ञ व विश्वरचना वैज्ञानिक), उमेश वाघमारे (उपयोजित भौतिकशास्त्र व मटेरियल सायन्स, काम्प्युटेशनल मेथड्स), सरितकुमार दास (मेकॅनिकल इंजिनिअरिंग), वेलायुथम मुरुगेशन (फिजिकल ऑरगॅनिक, इनव्हिरॉनमेंटल केमिस्ट्री) यांचा समावेश आहे.

२००२-२०११ या काळात प्रसिद्ध झालेल्या शोधनिबंधांच्या आधारे या वैज्ञानिकांची पुरस्कारासाठी निवड झाली आहे, असे थॉमसन रॉयटर्सचे सल्लागार डेव्हिड पेंडलबरी यांनी सांगितले. ज्या भारतीय वैज्ञानिकांना २००४, २००६ व २००९ मध्ये हा पुरस्कार मिळालेला आहे त्यांचा पुन्हा विचार करण्यात आलेला नाही. पुरस्कार विजेत्यांपैकी अनुनय सामंता हे हैदराबाद विद्यापीठात रसायनशास्त्राचे प्राध्यापक आहेत. मुरली शास्त्री हे इंडिया इनोव्हेशन सेंटर, डीएसएम इंडिया प्रा.लि या संस्थेचे संचालक आहेत.





पुण्याच्या आयुकाचे शास्त्रज्ञ धनू पद्मनाभन आणि वरुण साहनी

रबिन बॅनर्जी हे एस.एन बो. नॅशनल सेंटर फॉर बेसिक सायन्सेस या संस्थेत वरिष्ठ प्राध्यापक आहेत . संदीप त्रिवेदी हे टाटा मूलभूत संशोधन संस्थेत सैद्धान्तिक भौतिकविज्ञान शिकवतात. सरितकुमार दास हे आयआयटी मद्रास येथे मेकॅनिकल इंजिनिअरिंग विभागात प्राध्यापक आहेत. थानू पद्मनाभन हे पुण्याच्या इंटर युनिव्हर्सिटी सेंटर फॉर अॅस्ट्रॉनॉमी अँड अॅस्ट्रोफिजिक्स म्हणजेच आयुका या संस्थेत संशोधक वैज्ञानिक आहेत. उमेश वाघमारे हे जवाहरलाल नेहरू सेंटर फॉर अॅडव्हान्स्ड सायंटिफिक रीसर्च या संस्थेत सैद्धान्तिक विज्ञान विभागात प्राध्यापक आहेत. वरुण साहनी हे आयुकात प्राध्यापक आहेत.